# DR.MADHUKARRAO WASNIK PWS ARTS AND COMMERCE COLLEGE

Scanned with CamScanner

B.COM 2ND YEAR IVth SEMESTER

# SUBJECT:- MONETARY ECONOMICS-2

## MEDIUM:- ENGLISH, HINDI, MARATHI

**Subject Teacher:-**

**Mamta M. Tayade**

**Ashwini A. Landge**

Scanned with CamScanner

पेज नं 1 # Unit :- I

Page No.
Date: / /

## *1. व्यापारी बँकाची उत्क्रांती :-

## * व्यापारी बँकाची उत्क्रांती :-

1 एप्रिल 1935 ला भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली.

व्याख्या :-

हार्ड यांच्या मते,

"बँककर (अधिकोष) म्हणजे असा व्यक्ती की, जो आपल्या सामान्य व्यवहारात पैसे स्विकारते आणि ज्यांच्याकडून किंवा ज्यांच्या खात्यावर पैसे जमा होत असतील त्यांचे चेक स्विकारून पैशाची परतफेड करते."

फिनले यांच्या मतानुसार,

"जी संस्था कर्जाची सुरक्षितता विचारात घेऊन गरजू व्यक्तींना रकमा उधार देतात, आणि पैशाची गरज नसतांना लोक आपल्याजवळची पैसा विश्वासाने ज्या संस्थेजवळ ठेवतात, त्या संस्थेला बँक असे म्हणतात.

बँ

# बँका (अधिकोष)

- केंद्रीय बँक
- सामान्य बँका
  - अल्पकालीन कर्जपुरवठा करणाऱ्या बँका
    - व्यापारी बँका
    - सहकारी बँका
    - विदेशी विनिमय बँका
  - दीर्घकालीन कर्जपुरवठा करणाऱ्या बँका
    - औद्योगिक बँका
    - भूविकास बँका
- विशिष्ट बँका
  - बचत बँका
  - देशी साव… कार

## बँकेचे प्रकार -

प्रत्यक्षनिर्मिती करणे किंवा वस्तू व्यक्तींना कर्ज देणे हे बँकेचे महत्त्वाचे कार्य आहे. बँकेने दिलेल्या कर्जाचा प्रकार, कर्जाची मुदत आणि कर्ज घेणाऱ्या व्यक्तींचा वर्ग. अशा निरनिराळ्या आधारावर बँकेचे वर्गीकरण केले जाऊ शकते.

बँकेने दिलेल्या कर्जाची मुदत हा आधार मानल्यास बँकेचे पुढीलप्रमाणे दोन वर्ग पडतात.

1) अल्पमुदतीचे कर्ज घेणाऱ्या बँका
2) दिर्घमुदतीचे कर्ज देणाऱ्या बँका

ज्या व्यक्तींना कर्ज दिले जाते त्या व्यक्तींचा व्यवसाय हा आधार मानून बँकेचे पुढे आणखी प्रकार पाडता येते.

* केन्द्रीय बँक :- देशामधील मौद्रिक व्यवस्था व बँकिंग व्यवस्थेचे संचालन करण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या बँकेला केन्द्रीय बँक म्हणतात. देशात एकच केन्द्रीय बँक असते. ही बँक देशामधील सर्व बँकांना विविध प्रकारे साहाय्य करते, त्यांच्या कारभारावर देखरेख व नियंत्रण करते.

Scanned with CamScanner

4

* सामान्य बँका :-

1) व्यापारी बँका
2) सहकारी बँका
3) विदेशी विनिमय बँका
4) औद्योगिक बँका
5) भूविकास बँका

1) व्यापारी बँका :-
प्रत्येक व्यापारी बँक बँकेची सर्वसामान्य कार्ये करते. व्यापारी बँका प्रामुख्याने अल्पमुदतीचा कर्जपुरवठा करतात.

2) सहकारी बँका :-
1904 साली देशात सहकारी पतपेढ्यांचा कायदा करण्यात आला व त्यानंतर सहकारी बँकांची स्थापना करण्यात येऊ लागली.

3) विदेशी विनिमय बँका :-
विदेशी विनिमय बँका आयातक व निर्यातक व्यापाऱ्यांना विदेशात शोधन करण्याकरिता व विदेशातील व्यापाऱ्यांकडून शोधन मिळविण्याकरिता साहाय्य करतात.

ह्या बँका विदेशी व्यापाराकरिता संबंधित व्यापाऱ्यांना अल्पमुदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करतात

4) औद्योगिक बँका :-

उद्योगांना कारखान्याची इमारत बांधण्यासाठी, तसेच यंत्रसामुग्रीची खरेदी करण्यासाठी दीर्घमुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. उद्योगांची ही गरज भागविण्याचे कार्य औद्योगिक बँका करतात.

5) भूमिबंधक बँका :-

शेतकऱ्यांना हवे असलेले दीर्घमुदतीचे कर्ज पुरविण्यासाठी भूमिबंधक बँकांची स्थापना केली जाते.

* विशिष्ट बँका :-

1) बचत बँका
2) देशी सावकार बँका

1) बचत बँका :-

लोकांना बचत करण्यासाठी प्रवृत्त करणे, नियमित बचत करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे तसेच समाजात इतस्ततः विखुरलेली बचत गोळा करून ती उत्पादक कार्याकडे वळविणे, इ. कार्ये करण्यासाठी बचत बँकांची स्थापना केली जाते.

आपल्या देशात पोस्ट ऑफिस बचत बँकेचे कार्य करतात.

2) देशी सावकार :-

आपल्या देशात फार पूर्वीपासून कर्ज देण्याचे व्यवहार करणारे सावकार बँकिंगची कार्ये करीत आले आहेत. लोकांजवळच्या बचती; ठेवी म्हणून स्वीकारून गरजू व्यक्तींना कर्जपुरवठा करणे हे देशी सावकारांचे मुख्य कार्य होय.

व्यापारी बँकेची कार्ये :-

1) ठेवी स्वीकारणे
1) मुदती ठेवी
2) बचत ठेवी
3) चालू ठेवी
4) गृहकोष ठेवी

2) कर्ज देणे
अ] अधिकोष अधिविकर्ष किंवा ओव्हरड्राफ्ट
ब] कर्ज आणि अग्रिम
क] रोख प्रत्यय

3) हुंडी वटविणे
4) एजन्सीची कार्ये करणे
अ] रकमा गोळा करणे
ब] शोधनाचे कार्य करणे
क] रकमांचे स्थानांतरण
ड] प्रतिभूतींची खरेदी - विक्री

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

5) विविध प्रकारच्या सेवा करणे.
अ) सुरक्षा संग्रह
ब) प्रत्ययपत्रे
क) व्यापाऱ्याची माहिती सांगणे

6) विदेशी विनिमयासंबंधीचे कार्य करणे.

## *2. व्यापारी बँकांची प्रत्यय निर्मिती :

सेयर्सच्या शब्दात

" ग्राहकाना अशा प्रकारे बँकेच्या नावाचा उपयोग करण्याचा अधिकार देऊन त्याच्या सहीची बाजारात किंमत वाढवेण्याच्या प्रक्रियेला प्रत्यय निर्माण करणे असे म्हणतात.

प्रत्ययनिर्मितीचे मार्ग :-

1) पत्रमुद्रांचे निर्गमन
2) ठेवींची निर्मिती
अ) रोख ठेवी
चालू ठेवी
मुदतीच्या ठेवी
बचत ठेवी
ब) निर्मित ठेवी

Page No.
Date

## प्रत्ययनिर्मितीच्या मर्यादा :-

1) रोख अनुपात
2) लोकांच्या सवयी
3) केंद्रीय सरकारचे धोरण
4) चलनात असलेली रोख
5) समायोधनगृहाची सोय
6) तारणाचे स्वरूप
7) व्यवसायामधील परिस्थिती

## * 3. व्यापारी बँकाचे गुंतवणूक धोरण *

### व्यापारी बँकाच्या गुंतवणूक धोरणाचे महत्व -

गुंतवणूक धोरण हा व्यापारी बँकाचे यश निर्धारित करणारा महत्वाचा घटक आहे. व्यापारी बँकांनी त्यांचे गुंतवणूक धोरण शास्त्रीय-पणे निर्धारित करून, त्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील, त्यांचा विश्वास कायम राहील, ठेवींच्या परिमाणामध्ये वाढ होईल.

### गुंतवणूक धोरणाची मार्गदर्शक तत्वे :-

1) सुरक्षिततेचे तत्व
2) तरलतेचे तत्व
3) लाभकारकतेचे तत्व

## गुंतवणूकीमधील सुरक्षितेकरिता पुढील बाबी महत्वाच्या :-

1) कर्जाचा कालावधी अल्प असावा.
2) कर्जाचे उद्देश्य तपासून घ्यावे.
3) तारण पुरेसे असावे.
4) जोखमीची विभागणी करावी.

## व्यापारी बँकांच्या रोखता क्रम :-

अ] रोख कोष
ब] मागणी करताच मिळणारी रक्कम
क] वटविलेली विपत्रे
ड] रोखे
इ] कर्ज व अग्रिम

## गुंतवणूकीमधील तरलता प्रभावित करणारे घटक :-

1) लोकांच्या सवयी
2) बँकिंगचा विकास
3) संघटित शेअर बाजार
4) प्रत्ययाचा विकास

## 3) लाभकारकतेचे तत्व :-

अ] ठेवींवरील व्याज
ब] व्यवस्थापनावरील खर्च
क] हानीकरिता तरतूद
ड] लाभांश

Scanned with CamScanner

# 4. अनिष्पादित / नाममात्र संपत्ती

व्याख्या :-

## * अनिष्पादित मालमत्ता :-

बँकांनी दिलेल्या एकूण कर्जांपैकी ज्या कर्जाद्वारे व्याजाच्या रूपाने उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता नाहिशी झाली आहे, अशा बँकेजवळील कर्ज स्वरूपातील संपत्ती म्हणजे 'अनिष्पादित संपत्ती' होय.


बँकेने कर्ज दिल्यानंतर, ते कर्ज आणि त्या कर्जावरील सहा महिन्यापेक्षा अधिक काळासाठी व्याजाची रक्कम थकीत झाली असेल, तर त्याला 'अनिष्पादित संपत्ती' असे म्हणतात. यालाच 'नाममात्र संपत्ती' किंवा 'निष्क्रिय संपत्ती' किंवा 'अलाभदायी संपत्ती' म्हणतात. [ Non - Performing Assets - NPA ] असे म्हणतात.

## * संपत्तीचे वर्गीकरण :-


- दुय्यम संपत्ती ( दोन वर्षांच्या आतील )
- संशयित संपत्ती ( दोन वर्षे - पुढची
- बुडीत संपत्ती

* अनिष्पादित संपत्तीचे निकष :-

अनिष्पादित संपत्तीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.



## संपत्ती अनित्पादित होण्याची कारणे :-



# THANK YOU

Scanned with CamScanner